REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 5 | FEBRUARY – 2017

# मराठी बखर : एक स्वतंत्र वाङ्‌मय प्रकार

प्रा. डॉ. जे. एफ. पाटील
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ.

## बखर हे नाव कसे पडले :–

मध्ययुगीन मराठीतील विवक्षित (उद्दिष्ट, नेमका) गद्य वाङ्‌मयाला 'बखर' म्हटले जाते. बखर वाङ्‌मयाचे स्वरूप अभ्यासले असता ते 'चरित्र', 'आख्यान' किंवा 'वंशानुकथन' या प्रकारचे वाटते. तर, कधी ते 'कैफियत', 'थैली' सारखे आढळते. 'बखर' लाच कधी 'हकीगत' 'वृत्तांत', 'अखबार' म्हणूनही ओळखले जाते. या अनेकविध प्रकारांनी लिहिलेल्या मध्ययुगीन मराठी गद्याला 'बखर' हे सर्वसमावेशक नाव दिले आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते, ''बक = बकणे, बोलणे या धातूपासून 'बखर' शब्द मराठीत निपजला आहे. ह्यावरून असे अनुमान करावे लागते की, फार पुरातन काळी बखरी तोंडाने बोलत असत, हाताने लिहीत नसत. तोंडाने बखरी बोलण्याचा हा काळ दोन–अडीच हजार वर्षापलिकडील असावा.........परंतु बखर (स्त्री) या शब्दाचा रूढार्थ राजकीय बातमी, इतिहास असा आहे. मुसलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला.''[1] असे त्यांनी म्हटले आहे. म्हणजे बखर लेखन हे फारशी तवारिखांच्या परिचयाने, अनुकरणाने झाले असा एक तर्क त्यांनी काढला आहे.




मराठी बखर लेखनाचा संबंध 'वीरयुगाशी' येतो आणि या वीरयुगाची सुरूवात शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतून झाली आहे. या वीरयुगाचा एक आविष्कार म्हणजे 'बखर'. पराक्रमी पुरूषांची चरित्रे खुलवून, सजवून चित्रित करावीत आणि अशा अनेक पुरूषांची आहुती घेणाऱ्या युध्दप्रसंगांचे रोमहर्षक वर्णन करावे, हाच बखर लेखनामागचा मुख्य उद्देश होता. स्वराज्यस्थापनेच्या आधी लिहिलेल्या बखरीतही मुख्यतः युध्दप्रसंगांचीच वर्णने आहेत. म्हणून या वीरयुगाच्या आविष्काराला 'बखर' हे नाव कुणी ? आणि का ? दिले असावे असा प्रश्न अभ्यासकांना पडतो.

या बखर गद्य लेखनाच्या सुरूवातीबद्दल गं. ब. ग्रामोपाध्ये लिहितात, ''बखर लेखनाची परंपरा थेट ऋग्वेदकाळापर्यंत जाते. बखर हे फारशी वळणाचे नाव, अर्थात नंतरचे. पण वीरपुरूषाचे चरित्र–आख्यान जे बखरलेखनाचे प्राणभूत लक्षण म्हणजेच Genre – ते ऋग्वेदातील राजप्रशस्तीवर्णनात आढळते. नाराशंसी व गाथा ही त्यांची नावे. नाराशंसी म्हणजे नराची वा नरश्रेष्ठांची प्रशंसा वा प्रशस्ती आणि गाथा म्हणजे गीतगान. या दोहोंचा संबंध यज्ञयागाशी निकटचा होता. अश्वमेध यज्ञाच्या वेळी तो करणाऱ्या राजाची शौर्यगाथा गाइली जाई. या नाराशंसी – गाथांना धार्मिकतेपेक्षा वाङ्‌मयीन रूप अधिक असे.......

आख्यानांचे अस्तित्वही वेदकाळात सापडते. शुनःशेपाख्यान व पुरूखाख्यान इत्यादी......वेदकाळापासून आख्यान, वंशानुचरित, गाथा आणि पुराणकथा यांची जी जी परंपरा आढळते, तिचाच एक मराठीतला प्रथम गद्य–पद्य स्वरूपाचा आणि नंतर निव्वळ गद्य स्वरूपाचा आविष्कार म्हणजे बखर म्हणून संबोधिला गेलेला लेखन प्रकार.''[2] असे मत व्यक्त करून ते पुढे लिहितात, ''प्रेरणा आणि परंपराइतकेच नव्हे तर प्रकृती व प्रयोजन या सर्वच दृष्टींनी बखर ही भारतीय जातकुळीची ठरते. बखरकारांच्या पुढे जे लेखनादर्श होते ते हे भारतीय पूर्वग्रंथ.......शिवाय महिकावतीच्या बखरीची 1448 साली लिहिली गेलेली प्रकरणे (दुसरे व तीसरे) लक्षात घेतली तर त्यावेळी मुसलमानांच्या फारशी तवारिखांना मराठी बखरकारांचा परिचय असणे आणि ते त्यांनी प्रभावित होणे असंभवनीय होते. शिवाय प्रस्तुत बखरीचे मूळ लेखनच मुळी महाराष्ट्रधर्माच्या प्रतिपादनार्थ झालेले आहे. म्लेच्छार्णवाला विरोध करणारा, नव्हे तत्संबंधाने तिडीक असणारा बखरकार म्हणजे केशवाचार्य फारशी तवारिखांचे अनुकरण करील हे अशक्यच होते.''[3] असे ते सप्रमाण स्पष्टीकरण देतात.

पूर्वीच्या काळी महाकाव्याचे वा पुराणांचेही गायन वा कथनच होत असे तसेच महिकावतीच्या बखरीवरील व नंतरच्या अन्य बखरीवरील पुराणांचा पडलेला हा प्रभाव पाहता 'बक' धातूपासून 'बखर' शब्दाची दिलेली व्युत्पत्ती बरोबर वाटत नाही.

तसेच 'खबर' पासून वर्णविपर्यासाने 'बखर' शब्द आला हे भाषाशास्त्रदृष्टया मान्य केले तरी तेवढ्यावरून बखरीचे लेखन तवारिखांवरून अनुकरणाने केले गेले, हे ही सिध्द होऊ शकत नाही. तवारिख म्हणजे तारीख व तवारिखा म्हणजे तारीखवार घडलेल्या हकीगतींची नोंद, म्हणजेच इति + ह + आसः = इतिहास. असे इतिहास मुस्लिम राज्यकर्त्यांनी लिहून घेतले आहेत. उदा. 'अकबरनामा', 'अलगीर–नामा', 'अलिनामा' इत्यादी. हे सर्व इतिहास आहेत. शिवाय या इतिहास म्हणून लिहिल्या गेलेल्या तवारिखा हेन्री एलिएट सारख्या पाश्चात्य इतिहासकारांना इतिहास वाटत नाही. याबद्दल गं. म. ग्रामोपाध्ये पुढे लिहितात, ''......पाश्चात्य इतिहासकारांच्या मतानुसार व आपल्या आजच्या इतिहासासंबंधीच्या कल्पनेनुसार तवारिखांत बखरींप्रमाणे भाकडकथांचे भारूड आढळत असले तरी तेवढ्याने मराठी बखरी तवारिखांच्या अनुकरणाने लिहिल्या गेल्या असे अनुमान काढणे योग्य नव्हे. कारण दोघांचे उद्देशच मुळात वेगळे आहेत. तवारिखांचे लेखन इतिहास म्हणूनच झाले आहे तर, बखरींचे लेखन चरित्र, आख्यान, वंशानुचरित इत्यादी हेतूंनी झालेले आहे.''[4]

महिकावतीच्या बखरीनंतर त्याच काळाच्या सुमारास दक्षिणेत 'राक्षसतागडीची बखर' (इ. स. 1565–66) लिहीली गेली तिच्यात 'बखर' शब्द नसला तरी आपल्या या अहवाल लेखनाला बखरकार 'बखेर' म्हणून संबोधतो. म्हणून बखरीपासून मराठी बखरींना 'बखर' ही संज्ञा पडली. तीही तिचे मूळ स्वरूप व प्रयोजन इतकेच नाही तर प्रेरणा व परंपरा लक्षात न घेता तिच्यातील हकीगत व वृत्तांत लक्षात घेऊन हे नाव दिले गेले. परंतु एकूण बखरीचा आशय पाहिला तर त्या नावाचा आणि फारशी तवारिखांचा काहीही संबंध नाही.

## बखर लेखनाची वैशिष्ट्ये :–

1. ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने बरेचसे बखर लेखन विश्वासार्ह नाही. ऐकिव वृत्तांत, कल्पना विलास, अतिशयोक्ती यांच्या आहारी जाऊन काही बखरकारांनी बखर लेखन केलेले आढळते. त्यामुळे बखरीची वाड्.मयीन गुणवत्ता वाढत असली तरी सत्यापासून त्या दूर जातात. म्हणूनच राजवाडे लिहितात की, ''एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस आहे.''[5]
2. बखरींचे लेखन गद्यात्मक आहे. अपवाद फक्त 'महिकावतीची बखर' ती मात्र गद्यपद्य मिश्रीत लिहीली आहे.
3. बखरी या स्वयंस्फूर्तीने लिहिल्या जाण्यापेक्षा कुणाच्या तरी आश्रयाने लिहील्या गेल्या आहेत, असे बखरीच्या सुरूवातीच्या उल्लेखावरून वाटते. त्यामुळे बखरींच्या कलात्मक स्वरूपाला बऱ्याचदा बाधा येण्याची शक्यता असते. कारण धन्याच्या आज्ञेवरून लिहायचे म्हणजे त्यांची मर्जी सांभाळून, त्यांचा गौरव करणारे लिहावयाचे, साहजिकच धन्याची अतिशयोक्ती स्तुती बखरींमध्ये आलेली आहे. त्यामुळे ती वास्तवापासून दूरही गेलेली आढळते. उदा. सभासदाची बखर, चिटणीसी बखर, भाऊसाहेबांची बखर इत्यादी.

4. बखरीचा प्रारंभ सामान्यपणे पुराणपध्दतीचा आणि शेवट देखील पुराणाप्रमाणेच फलश्रृतीच्या स्वरूपाचा असतो. कोणत्याही घटनेचा एकदम वृत्तांत न सांगता सृष्टीच्या उत्पत्तीपासून सुरूवात करून निरनिराह्या प्राचीन राजांच्या वंशाची ती माहिती दिलेली आढळते. शिवकालीन पगडीत हा प्रकार जास्त आढळतो. उदा. चिटणीसांचे सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र.

बखरीचा शेवट देखील फलश्रृतीच्या पुराणपध्दतीचा असतो. ''जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील यशस्वी असतील ते दिग्वीजयी होतील. येणेप्रमाणे सर्व मनोरथ पूर्ण होतील'' असा 'सभासदांच्या बखरी' चा शेवट आहे. चिटणीसांच्या बखरीतही, ''ही कथा श्रवण, मनन, पठण केली असता सर्व विघ्ने दूर होऊन पूण्य व यश प्राप्त होईल.'' अशी फलश्रृती आलेली आहे. फलश्रृतीचे मधाचे बोट पौराणिक आख्यानाचा खास विशेष होता. श्रध्दाळू भाविकांची त्यात सोय असते. बखरीत देखील या प्रकारचे अनुकरण केलेले दिसते.

5. बखरीतील लेखनशैली ही देखील पौराणिक पध्दतीची आहे. बहुतेच बखरींचा ऐतिहासिक थाट हरदासी पध्दतीचा दिसतो. श्रोत्यांचे मन हरपण्यासाठी हरदास ज्याप्रमाणे विवेचन करतो, ते खुलवितो. त्याचप्रमाणे बखरकारही वाचकांचे चित्त वेधण्यासाठी प्रयत्न करतो.

6. बहुतेक बखरींचे स्वरूप हे कथनपर किंवा आख्यानात्मक आहे. बखर हा एक प्रकारचा इतिहास असल्यामुळे त्याचे स्वरूप कथनपर होते. कथात्मक पध्दतीने ऐतिहासिक घटनांचे निवेदन हे बखरींचे खरे स्वरूप होय. हे निवेदन रंगतदार होण्याचा यशस्वी भाग म्हणजे लेखनाची पौराणिक पध्दतीची शैली होय.

7. बखरींची चटकदार नाट्यपूर्ण शैली ही बखरीच्या वाड्.मयीन यशात फार महत्त्वाचा वाटा ठरली आहे. ही शैली अत्यंत रंजक आणि प्रसंगातील व्यक्तीजीवनाचे नाट्य पकडणारी आहे.

प्रसंगातील नाट्य जीवंतपणे उभे करण्यात बखरकार यशस्वी झाले आहेत. उदा. महिकावतीच्या बखरीत कित्येक दिवस झाले तरी किल्ला हस्तगत होत नाही म्हणून बखरकार वर्णन करतो, ''चिंचवडी खाल्ले त्या चिंचोक्यांचे वृक्ष झाले त्यांच्या चिंचा झाला इतके दिवस राहिले तरी गड हाती आला नाही.'' या वर्णनात अतिशयोक्ती उघड आहे परंतु कल्पनाविलासाची ही चमत्कृती वापरून गड जिंकायला होणाऱ्या उशिराचा परिणाम नाट्यमयकृतीने वर्णन केला आहे. तसेच सभासदाच्या बखरीतील शिवाजी अफझल खानाच्या भेटीचे वर्णन, 'सप्त प्रकरणात्मक चरित्रात' अफजलखान व शिवाजी महाराज यांच्या भेटीप्रसंगीचे सवाल जवाबही मोठे नाट्यपूर्ण आहेत. ''राजे हेच की काय?', 'खान हेच की काय?'' (पृ. 79) शिवाजीने त्यास चेष्टेच्या पध्दतीने दिलेले उत्तर त्या प्रसंगातील नाट्यमयता वाढविते.

बखरीतील काही नाट्य व्यक्तीवैशिष्ट्यामुळे त्यांच्या व्यक्तीतील स्वभाववैशिष्ट्यामुळे निर्माण झालेली दिसून येईल. हे नाट्य ही बखरकाराने कौशल्याने शब्दांकीत केलेले आहे. 'भाऊसाहेबांची बखर' मधील युध्दाच्या प्रसंगी दत्ताजी शिंदेंनी दिलेले बाणेदार उत्तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख देते. कुतुबशाह याने अंबारीतून उतरून घायाळ दत्ताजी शिंदेंना विचारले, ''पटेल हमारे साथ तुम और बी लढेंगे !' दत्ताजी म्हणाले, ''निशा अकताला! बचेंगे तो औरबी लढेंगे!' तसेच, राघोबा दादांनी होळकरांवर स्वारींचा बेत केल्यावर अहिल्याबाईने राघोबास जे तडफदारपणाचे उत्तर पाठविले त्यातून अहिल्याबाईचा बाणेदारपणा आणि धीट स्वभाव लक्षात येतो – ''मी बायको असे समजू नका. खांद्यावर बासडा टाकून उभी राहीन तेव्हा श्रीमंतांच्या दौलतीस अवघड पडेल.'' इत्यादी असे अनेक नाट्यमय प्रसंग आले आहेत.

सुभाषिते, वाक्प्रचार, म्हणीमुळे बखरीच्या शैलीत आलेली नाट्यमयता अतिशय सुंदर, सूचक झाली आहे. बखरकारांनी वेळोवेळी वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते यांचा उचित वापर करून आपली शैली अधिक परिणामकारक, नाट्यपूर्ण केली आहे ते पुढील उदाहरणावरून दिसून येईल.

**वाक्प्रचार** : 'त्यांच्या पोटात हरणाचे काळजी शिरून निशाने माघारे घेऊन पळो लागले (भाऊसाहेबांची बखर)
'इराणी दुराणीचा मोहरम केला' (पानिपतची बखर)
'अशाने वेळ मांडवात कसे जातील' (होळकरांची कैफियत)

**म्हणी** : काही ठिकाणी प्रसंगाला उचित अशा म्हणी देऊन नाट्यात्मकता साधली आहे.
'नकटे असावे पण धाकटे असू नये' (भाऊसाहेबांची बखर)
'सभाग्य साधून जाय निघी आणि अभाग्य माझे मृतिका शोधी' ( भाऊसाहेबांची बखर)
'जैरी देवाची उजर (लेज), तैसी बुध्दी उपदेश करी'
बखरकार फक्त मराठीच म्हणींचा वापर करतात असे नाही तर ते संस्कृत म्हणींचा देखील वापर करतात – 'विनाश काले विपरीत बुध्दी'

**सुभाशिते** : संस्कृत, मराठी आणि हिंदी भाषेतील सुभाषितांचा समर्पक वापर करून नाट्मयता वाढविण्यात बखरकार यशस्वी झाले आहेत. बेमगांच्या सर्वाधिकारात्वामुळे राज्याची स्थिती कशी नाजुक झाली होती. त्याचे वर्णन करताना 'अबला यत्र प्रबला.......' हा समर्थ श्लोक दिला आहे.

शहाजी राजांनी तुकाबाईशी विजापूरी लग्न केले. त्या तुकाबाईच्या सौंदर्याचे वर्णन बखरकाराने अतिशय सुंदरपणे केले आहे.

पूर्ण चंद्रमुखी शामा। बालसूर्य समप्रभा
विशाल नेमारक्तोष्ठीचा। सा प्रिया।।

याशिवाय मराठी, हिंदी संतांच्या काव्यपंक्तींही बखरकारांनी योग्य ठिकाणी वापरून त्या–त्या प्रसंगातील नाट्यमयता वाढविली आहे.

आपल्या बळे घालवी कास। कोणाची न धरावी आस।।

पानिपतच्या युध्दात दत्ताजी शिंदे धारातीर्थी पडले, दुसरीकडे जन कोजी शिंदे घायाळ पडले, दुसरीकडे दुराणीचा आक्रमक पवित्रा अशा या स्थितीत दत्ताजीच्या पत्नीने शोक आवरला अशा स्थितीत तिचे उद्गार –

मेरे मन में कुछ और। कर्ता है कुछ और।
उधो–माधो कहे। झुठी मन की और।।

असे मराठी स्त्रीचे तेजस्वी, बोलके व्यक्तीत्त्व अन्यत्र क्वचितच रंगविलेले आढळेल.

**अलंकार** :– 'जैसे मुंगीस पंख फुटतात, तैसा प्रकार जाहली'
'जैसे भडभुंजे लाह्या भाजतात, तैशी गत केली'
'तुपाचे घागरीवर उंदिराचे पिटुकले वसते तैसा प्रकार जाहला'

वाक्प्रचार, म्हणी, सुभाषित, अलंकार म्हणजे अनुभवांचे आणि अनुभवाच्या अभिव्यक्तीचे साररूप असते त्यांच्या वापरामुळे लेखन शैली अधिक सजक व नाट्यपूर्ण होते. यावर होणारा आशय अधिक परिणामकारक बिंबविला जातो.

8. बखर लेखनाचे आणखी एक लक्षात ठेवण्यासारखे वैशिष्टये म्हणजे बखरकरांना अत्युक्तीबद्दल, अद्‌भुततेबद्दल आवड होती. चिटणीसांची सप्तप्रकरणात्मक, शिवचरित्रात्मक बखरीत मालोजीस महादेवाचा साक्षात्कार, मृत्यूसमयी विश्वदूताच्या विमानात बसून शिवाजी महाराजांचे कैलासाला गमन, त्यानंतर धरणी कम्प, उल्कापात, तह्याचे पाणी लाल होणे – अशी वर्णने आली आहेत. तसेच शालीवाहनांची बखर, महिकावतीची बखर, पेशव्यांची बखर इत्यादी बखरींमधूनही अशी अतिशयोक्तीपूर्ण वर्णन आली आहेत. अशा वर्णनातून कथाभाग अत्यंत रंजक व चटकदार करता येतो.
9. बखरींचा एक महत्त्वाचा लेखन विशेष म्हणजे रसपरिपोष होय. विशेषतः वीर आणि करूण रसांचा परिपोष बखरकारांनी अत्यंत प्रभावी रीतीने केलेला आहे. काही ठिकाणी तर दोन्ही रसांचे आश्चर्यकारक मिश्रणही आहे. दत्ताजी शिंदेच्या पत्नीचा शोक आणि तिचे जनकोजीस उत्तेजन देणारे भाषण फार प्रभावी आहे, ''बाबा तू रांडेसारखा रडतोस काय? दत्ताजी शिंदे यांचे पोटी चौघी लेकी झाल्या तैसीच तू एक आणखी झाली असती तरी आणीक एक जावई येता पाटील काय घेऊन गेले? सर्व तुम्हापाशी ठेवून गेले हिम्मत धरून सार्थक करावे आता रडून होणे काय?'' पती निधनानंतर अहिल्याबाई सती जायला निघाली त्यावेळी मल्हारराव होळकरांचे उद्गार

मनात कालवा कालव करणारे ठरतात. ''बाई, मला उन्हाळा करतेस की काय? तू माझे पाठीवर आहेस तर अहिल्या मेली, खंडू आहे हा माझा भरवसा.''

10. बहुतेक बखरी या वक्तृत्व, गुणांनीच नटलेल्या आहेत. भावनोत्कटता, आवेश, उदात्तता, भाषेचा अखंड ओघ इत्यादी मिळून वक्तृत्व गुण संपन्न होतो. हा गुण केवळ बोलण्यात असतो असे नव्हे लिहिण्यातही असते. दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यूचा प्रसंग, गौतमाबाईने केलेला मल्हारराव होळकरांचा निषेधाचा प्रसंग, बळवंतराव मेंहदळे यांचा मृत्यूचा प्रसंग हे सर्व भाऊसाहेबांच्या बखरीतील प्रसंग वक्तृत्व गुणांच्या उत्कटतेने रसरसलेले आहेत. उदा. सभासदांची बखर, चिटनिस कृत छत्रपती चरित्र, पेशव्यांची बखर यांच्यातही हा वक्तृत्व गुण आढळतो.
11. बखर लेखनातील प्रासादिकता, सुबोधता या महत्त्वाच्या विशेषामुळे बखरी वाचनीय झाल्या आहेत. जे सांगायचे ते सरळ साध्या रीतीने, सोप्या शब्दात सांगून आशय तात्काळ वाचकांच्या मनात उतरला पाहिजे ही दृष्टी बखरकारांची होती. कुठेही क्लिष्टपणा, बोजडपणा आढळत नाही. त्यामुळे बखरीतील ओघ सारखा वाहता राहतो. उदा. भाऊसाहेबांची बखर इत्यादी.

## बखर हा स्वतंत्र वाड्.मय प्रकार :–

बखर लेखनाची ही सर्व तपशिलवार वैशिष्टये अभ्यासल्यानंतर बखर हा एक स्वतंत्र वाड्.मय प्रकारच होय असा निष्कर्ष निघतो. मध्ययुगीन मराठीत पद्य वाड्.मयाला जेवढे महत्त्व मिळत गेले तेवढे महत्त्व गद्य वाड्.मयाला मिळालेले नाही. त्यामुळे बखरींकडे समीक्षक अजूनही उपेक्षित दृष्टीने पाहतात आणि बखर वाड्.मय गुणवत्तेच्या दृष्टीने कमी ठरविण्याचा प्रयत्न करतात. मराठीतील पद्य वाड्.मयाला, काव्य वाड्.मयाला प्राचीन काळापासून फार मोठी परंपरा होती. त्याच 'दीर्घ परंपरेतून पद्य वाड्.मय विकसत राहिले तशी परंपरा गद्य वाड्.मयाला नव्हती. बखरींचे लेखन हा मध्ययुगीन काळातील पहिलाच मोठ्या स्वरूपाचा गद्य आविष्कार होय. त्यामुळे काही दोष अपवाद वगळता जाणता–अजाणता त्यांनी 'वाड्.मयीन कलाकृती' निर्माण केल्या हे मान्य करायला हवे. आधुनिक ऐतिहासिक मराठी कादंबरीचा पूर्वावतार म्हणजे या बखरी होय असे त्यांच्या एकूण स्वरूपावरून अनुभवास येते. ऐतिहासिक कादंबरी हा वाड्.मय प्रकार म्हणून मान्यता पावला आहे. चित्तवेधक कथानक, संघर्षमय प्रसंग, अनेक प्रसंगातील नाट्य, प्रसंगोचित, रसोचित अशी भाषाशैली, अव्वल दर्जाचे संवाद कौशल्य, वाचकांची उत्कंठा वाढविण्याचे कसब, चटकदार वर्णने – हे सारे वाड्.मयीन गुणविशेष ऐतिहासिक कादंबरीप्रमाणेच बखरीतही आढळतात म्हणून बखर हा त्या काळात निर्माण झालेला एक स्वतंत्र, अभिनव असा वाड्.मयप्रकार मानला पाहिजे. बखरीच्या वाड्.मयतेबद्दल र. वि. हेरवाडकर लिहितात, ''रसवत्ता या एकाच वाड्.मयगुणाच्या दृष्टीने पाहिले, तरी बखरींची गणना वाड्.मयात करावयास हवी. लेखकाच्या भावनांचा कलात्मक आविष्कार म्हणजे वाड्.मय, ही वाड्.मयाची सर्वसामान्य व्याख्या बखरींना यथार्थतेने लागू पडते.''[6] तर ह. श्री. शेणोलीकर लिहितात, ''..........त्यांच्या लहान लहान तुटक–तुटक पण अर्थपूर्ण आणि जोरकस, प्रौढ व परिणामकारक भाषेने मराठी गद्याचे अंगभूत सामर्थ्य प्रकट केले हे निसंशय.''[7] बखरींना त्यांच्यातील ह्या विविध गुणवैशिष्टयांमुळे त्यांना वाड्.मयीन कलाकृतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे व एक वाड्.मयप्रकार म्हणून बखरकरांनी मराठीला अभिनव भेट दिली आहे. हे आपणास मान्य करावे लागेल.

## संदर्भ ग्रंथ :–

1) वि. का. राजवाडे, **'मराठ्यांच्या इतिहासाची साधने',** प्रस्तावना, र. वि. हेरवाडकर, **'मराठी बखर',** व्हीनस प्रकाशन, पुणे, 1975, द्वितीयावृत्ती, पृ. 2
2) गं. ब. ग्रामोपाध्ये, **'मराठी बखरवाड्.मयाचा पुनर्विचार'**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1996, पृ. 14
3) तत्रैव, पृ. 15
4) तत्रैव, पृ. 19
5) उ. नि., वि. का. राजवाडे, **'मराठयांचा इतिहासाची साधने** 'प्रस्तावना', पृ. 4
6) उ. नि., र. वि. हेरवाडकर, पृ. 35

7) ह. श्री. शेणोलीकर, **'प्राचीन मराठी वाङ्‌मयाचे स्वरूप**, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, स.आ. 1987, पृ. 204